

# आध्यात्मिक वृत्तीचे आणि जगीकदृष्ट्या बुद्धिमान

आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**

या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ऑप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Being Spiritually Minded & Earthly Wise)

# आध्यात्मिक वृत्तीचे आणि
# जगीकदृष्ट्या बुद्धिमान

# अनुक्रमणिका

परिचय

1. ख्रिस्ती जीवनातील तणाव 1

2. चुकीच्या निवडी, चुका आणि त्यांचे परिणाम 3

3. म्हणून, बुद्धिमान व्हा 5

4. आध्यात्मिक तरीही व्यावहारिक 6

5. बुद्धी—आमचे सुरक्षा कवच 9

6. देवाचा चांगुलपणा 11

# परिचय

**रोमकरांस पत्र 8 :28**

**परंतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांना म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांना देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात.**

पण वाईट निवडी, मूर्खपणाच्या चुका, चुकीचे निर्णय, आळशीपणाचे भयंकर परिणाम आणि योग्य तयारीचा अभाव या विषयी काय? ख्रिस्ती व्यक्तीच्या स्वतःच्या कृतींमुळे घडणाऱ्या गोष्टींबद्दल काय?त्या ख्रिस्ती व्यक्तीविषयी काय जो बराच आध्यात्मिक प्रवृत्तीचा आहे, व ज्याने स्वतःला या जीवनाच्या बाबींसंबंधी शिक्षित करण्यास लक्ष दिले नाही? ख्रिस्ती व्यक्तीच्या स्वतःच्या बेजबाबदारपणामुळे घडणाऱ्या त्या गोष्टींचे काय? देव त्या गोष्टी घडवून आणत आहे का ?

आपण अनेक ख्रिस्ती व्यक्तींना दुःख भोगताना आणि जवळजवळ अटळ दबावांमध्ये अडकलेले पाहतो. आपले पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की देव त्याच्या लोकांना कठीण काळातून जाण्याची आणि त्यांना सामोरे जाण्याची परवानगी देतो यासाठी की त्यांचा फायदा घेऊन त्यांनी बळकट व्हावे. दुःख आणि संकटांचे हे अनुभव देवाने ठरवलेले आहेत का?

आपण थांबून गोष्टींचे थोडे बारकाईने परीक्षण केले तर, आपण घेतलेले निर्णय आणि निवड ओळखण्यात समर्थ होऊ ज्याने अखेरीस आम्ही कधीकधी स्वतःलाच संकटात पाडतो. हे आम्ही ज्या दुर्घटनांना तोंड देत आहोत, ते आमच्या चुकीच्या निर्णयांमुळे होते—मग ते कोणत्याही स्वरूपात का असेना. आपण आपल्या अनुभवांना आत्मिक रूप देऊन अशा दुःखांसाठी देवाला जबाबदार धरावे का? हे खरे

आहे की आपण सर्व चुका करतो कारण आपण परिपूर्ण नाही. ज्या परिस्थितीस आपण प्रथमच सामोरे जातो, त्यामध्ये घेतलेल्या चुकीच्या निर्णयाचे गंभीर परिणाम होऊ शकतात. आपण केलेल्या चुकीच्या निवडींचा देवाने आपल्यासाठी केलेल्या योजनांवर कसा परिणाम होतो? आपल्या चुका देवाच्या सर्वोच्च आणि सर्वोत्तम आपल्या चुका देवाचे सर्वोच्च आणि सर्वोत्तम हेतू आपल्या जीवनात पराभूत करतात काय, बदलतात काय किंवा कोणत्याही प्रकारे पूर्ण होण्याच्या मार्गात अडथळा आणतात काय? या पुस्तकाचा उद्देश आपल्या ख्रिस्ती विश्वासाच्या व्यावहारिक बाजूबद्दल आपल्याला जागृत करणे हा आहे. आपल्या जीवनासाठी देवाची योजना पार पाडण्याची आपली गंभीर जबाबदारी आपल्याला समजावी हा त्याचा उद्देश आहे. आपल्या कृतींना आत्मिक रूप देणे थांबवावे आणि त्यांची जबाबदारी स्वतः घेणे हे एक आव्हान आहे. या जीवनातील कठीण परिस्थितीत “शहाणे” होण्याचा हा उपदेश आहे.

देव तुम्हास आशीर्वाद देवो
आशीष रायचूर

# 1
# ख्रिस्ती जीवनातील तणाव

**कलस्सै 3:1,2**

**[1] म्हणून तुम्ही ख्रिस्ताबरोबर उठवले गेला आहात, तर ख्रिस्त देवाच्या उजवीकडे जेथे बसला आहे, तेथल्या वरील गोष्टी मिळवण्याचा यत्न करा.**
**[2] वरील गोष्टींकडे मन लावा. पृथ्वीवरील गोष्टींकडे लावू नका.**

एका ख्रिस्ती व्यक्तीच्या जीवनात सतत तणाव असल्याचे दिसते कारण तो दुसऱ्या राज्यातील लोकांमध्ये राहत असताना *"प्रथम देवाचे राज्य शोधण्याचा"* (मत्तय 6:23) प्रयत्न करतो, जे देवाच्या राज्याच्या अगदी विरुद्ध आहे. आपण येथे पृथ्वीवर आहोत, परंतु आपण त्या वरच्या गोष्टी शोधल्या पाहिजेत, ज्या स्वर्गीय आहेत. पृथ्वीवर राहण्यासोबत करियर घडवणे, "कोणीतरी बनणे," यश प्राप्त करणे, संपत्ती साठवणे यासारख्या  प्रचंड जबाबदाऱ्या येतात आणि तरीही आपण तरीही जवळजवळ अविरत उद्योगा दरम्यान, आम्हाला आमचे मन वरील गोष्टींकडे—आमचा स्नेहभाव, आमच्या आवडी, आमच्या आवडी, आमचे छंद—लावण्याचे आवाहन केले जाते! एखाद्या व्यक्तीच्या आध्यात्मिक, मानसिक आणि भावनिक क्षमतांस ताण देणारे कोणतेही खरे आव्हान असेल तर ते हे असावे असे दिसते! पण मग पुन्हा, देव आपल्याला असे आव्हान देणार नाही जे आपण पूर्ण करू शकत नाही. त्याने आम्हाला ही आज्ञा दिली आहे कारण त्याला माहित आहे की आपण ते करू शकतो—आपण एकट्याने नव्हे तर त्याने प्रदान केलेल्या सामर्थ्याने—त्याचे पालन करण्यासाठी. तरीसुद्धा, आपल्या जीवनात या आज्ञेचे पालन केल्याने "तणाव" येतो जो "वास्तविक" जगात कार्यरत असलेल्या प्रत्येक आध्यात्मिकदृष्ट्या प्रौढ ख्रिस्ती व्यक्तीला नक्कीच ओळखता येतो .

दैनंदिन जीवनात अनेक “समस्या” आहेत जिथे ख्रिस्ती व्यक्तीला दोन दिशांनी “खेचले” जात असल्यासारखे वाटते. उदाहरणार्थ, यशाचे योग्य माप कोणते? ऐहिक मानकांनुसार यश हे साध्य केलेल्या गोष्टी आणि कमावलेल्या पैशांच्या संदर्भात मोजले जाते, तर देवाच्या राज्यात यश हे एक व्यक्ती पित्याच्या इच्छा पूर्ण करत आहे किंवा नाही याद्वारे निर्धारित केले जाते सांसारिक उद्दीष्टे साध्य करणे आणि पैसा मिळवणे यात काहीही चूक नाही, परंतु देवाचे उच्च पाचारण आपल्याला *“ते मिळविण्यासाठी आपला जीव द्या असे म्हणते”* (मत्तय 16:25). म्हणून, ख्रिस्ती व्यक्तीला जीवनातील अशा टप्प्यांकडे जाताना सतत संघर्षाला तोंड द्यावे लागते जेथे त्याला हा निर्णय घ्यायचा आहे की त्याने कोणता मार्ग निवडावा—जो मार्ग एखाद्याला यशाच्या जगीक मापांनुसार वाढण्यास कारणीभूत ठरतो किंवा जो मार्ग ख्रिस्तामधील उच्च पाचारण पूर्ण करण्याच्या दिशेने प्रगती करतो.

ख्रिस्ती व्यक्तीला अनेक “संघर्षाच्या” क्षेत्रांव्यतिरिक्त, त्याच्या पृथ्वीवरील प्रवासादरम्यान जगाशी आणि सैतानाशी संघर्ष केला पाहिजे. प्रभु येशूने स्वतः म्हटले आहे कारण ह्या युगाचे लोक आपल्या *“अन्यायी कारभाऱ्याने शहाणपण केले. ह्यावरून धन्याने त्याची वाहवा केली; कारण ह्या युगाचे लोक आपल्या-सारख्यांविषयी प्रकाशाच्या लोकांपेक्षा शहाणे असतात”* (लूक 16:8). हे असे नसावे, परंतु काहीवेळा गोष्टी अशाच असतात, विशेषत: जेव्हा प्रकाशाचे लोक पिता त्यांना उपलब्ध करून देत असलेल्या बुद्धीच्या दैवी तरतुदींचा वापर करण्यात अयशस्वी ठरतात. ख्रिस्ती व्यक्तीला दैनंदिन जीवनातील क्रियाकलापांमध्ये “या जगाच्या लोकांशी” संबंध ठेवण्यास, त्यांच्यासोबत काम करणे करण्यास आणि बऱ्याच बाबतीत स्पर्धा करणे करण्यास शिकले पाहिजे. त्याच वेळी, ख्रिस्ती व्यक्ती देखील सैतानाच्या योजनांचे लक्ष्य आहे. एक सैतान आहे ज्याला ख्रिस्ती व्यक्तीला देवाच्या सर्वोच्च आणि सर्वोत्तमापासून दूर जाण्यासाठी मोहात पाडण्यात आणि त्रास देण्यात आनंद वाटतो.

# 2
# चुकीच्या निवडी, चुका आणि त्यांचे परिणाम

**गलतीकरांस पत्र 6:7,8**

**7 फसू नका; देवाचा उपहास व्हायचा नाही; कारण माणूस जे काही पेरतो त्याचेच त्याला पीक मिळेल.**

**8 जो आपल्या देहस्वभावासाठी पेरतो त्याला देहस्वभावा-पासून नाशाचे पीक मिळेल; आणि जो आत्म्यासाठी पेरतो त्याला आत्म्यापासून सार्वकालिक जीवन हे पीक मिळेल.**

या आणि इतर “तणावांच्या” काळात, तसेच जगाचा दबाव आणि सैतानाच्या प्रलोभनांदरम्यान, ख्रिस्ती व्यक्तीकडून नक्कीच चुका होण्याची शक्यता असते. असे म्हणणे निराशावादी आणि नकारात्मक वाटू शकते, परंतु हे खरे आहे की आपण जीवनात कधीकधी चुकीच्या निवडी करतो आणि वाईट निर्णय घेतो. जीवनाचा जोडीदार निवडताना ज्यांनी तडजोड केली आहे अशा अनेक विश्वासणाऱ्यांचा विचार करा. शैक्षणिक आणि कारकीर्द पर्याय, राहण्याचे ठिकाण, मित्र, आर्थिक व्यवस्थापन, छंद इत्यादींशी संबंधित अनेक निर्णयांचा विचार करा. जसजसे कोणी त्याच्या स्वर्गीय पाचारणाचा पाठपुरावा करत राहतो, तसतसे गोष्टी अधिक गंभीर होतात, कारण त्याला हे समजू लागते की जेव्हा तो त्याच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्र ठरवतो—कुठे, केव्हा, काय आणि कसे—याचा या पृथ्वीवरील देवाच्या राज्यावर परिणाम होतो.

आपल्या सर्व निर्णयांचे परिणाम होतात. आपल्यापैकी काहींना या प्रकरणाचे गांभीर्य कळत नाही. आपला देव दयाळू देव आहे हे जाणून आपण जाणूनबुजून किंवा नकळत त्याचा “फायदा” घेतो. होय, देवाच्या

राज्यात सर्व काही कृपेने आहे परंतु तरीही, परमेश्वराने आपल्यावर काही जबाबदाऱ्या टाकल्या आहेत. आपल्याला शिकवलेल्या सत्यांनुसार जगणे ही आपली जबाबदारी आहे. आपण जे काही करतो त्यात कठोर परिश्रम करणे आणि आळस टाळणे ही आपली जबाबदारी आहे. आपल्या शारीरिक स्वभावाला वधस्तंभावर खिळण्याची आणि जगाच्या आणि सैतानाच्या प्रलोभनांचा प्रतिकार करणे ही आपली जबाबदारी आहे. या काही गोष्टी परमेश्वर आपल्यासाठी करणार नाही. तो आपल्याला बुद्धी देईल (जर आपण त्याचा शोध घेतला तर) परंतु निर्णय आपलेच आहेत आणि आपण घेतलेल्या निर्णयांचे परिणाम भोगण्यास आपण तयार असले पाहिजे.

# 3
# म्हणून, बुद्धिमान व्हा

**मत्तय 10:16**
**पाहा, लांडग्यांमध्ये मेंढरांना पाठवावे तसे मी तुम्हांला पाठवतो; म्हणून तुम्ही सापांसारखे चतुर व कबुतरांसारखे निरुपद्रवी व्हा.**

मेंढरे—देवाचे लोक—विशेषतः अनुकूल वातावरणात नाहीत! याबद्दल आपल्याला चेतावणी देऊन, प्रभू येशूने आपल्याला *"सापांसारखे चतुर आणि कबुतरासारखे निरुपद्रवी"* राहण्याची सूचना दिली. जग हे विरोध करणारे आणि दुष्ट असले तरी आपण वाईट होऊन त्याच्या वाईटाशी जुळवून घेऊ नये. त्याऐवजी, आपण *"बऱ्याने वाइटाला जिंकायचे"* (रोमकरांस पत्र 12:21) आहे. आपल्याला ख्रिस्ताच्या कृपेत आणि सद्‌णांत चालायचे आहे. मित्र नसलेल्या जगात *"कबुतरासारखे निरुपद्रवी"* राहण्याचा आग्रह येशूने केला तेव्हा त्याचा अर्थ असा होता. येशूच्या इशाऱ्याचा दुसरा पैलू *"सापासारखे चतुर"* होता. या जगात वावरताना आपण बुद्धिमान आणि विवेकी राहावे. आम्ही आपल्या आध्यात्मिकतेत बुद्धी आणि समज यांची सांगड घालावी, विशेषतः या जीवनांतील बाबींसंबंधाने. या जगातील लोक सहसा आपल्या आध्यात्मिकतेने प्रभावित होत नाहीत. खरे तर, अनेक लोक आध्यात्मिक वृत्तीच्या ख्रिस्ती लोकांकडे  तुच्छतेने आणि तिरस्काराने पाहतात. म्हणून, जर आपल्याला टिकून राहायचे असेल आणि जगामध्ये विजयी होऊन  जगायचे असेल तर आपल्याला बुद्धीची आवश्यक आहे.

# 4
# आध्यात्मिक तरीही व्यावहारिक

आध्यात्मिक असणे जितके चांगले आणि विशेषतः महत्वाचे आहे तितकेच आपण व्यावहारिक असणे देखील आवश्यक आहे. केवळ आध्यात्मिक असण्याने देवाचा उद्देश पूर्ण करण्यात आणि पृथ्वीवर देवासाठी बरेच काही साध्य करण्यात यशस्वी होण्याची खात्री मिळत नाही. एका व्यक्तीला आध्यात्मिकतेसोबत व्यावहारिक ज्ञान आणि समज यांची सांगड घालायला हवी. उदाहरणार्थ, तुम्ही ख्रिस्ती आहात याचा अर्थ तुमचा विवाह यशस्वी होईल याची खात्री नसते. तुम्हाला तुमचे वैवाहिक जीवन आणि कुटुंब तयार करताना व्यावहारिक समस्या समजून घेणे आवश्यक आहे आणि आनंदी कुटुंब तयार करण्यासाठी त्या समजबुद्धीचा वापर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, आपण दशमांश तसेच दान दिले आणि नंतर आर्थिक समृद्धीची अपेक्षा केली तर ते पुरेसे नाही. शिवाय, तुमचा उरलेला पैसा हुशारीने कसा वापरायचा हे तुम्हाला शिकण्याची गरज आहे.

तुमचा असा विश्वास आहे की देव त्याच्या मुलांना बरे करतो आणि त्यांना दैवी आरोग्याचा आशीर्वाद देतो, याचा अर्थ असा नाही की तुम्ही तुमच्या खाण्याच्या सवयींमध्ये शिस्तभंग करू शकता किंवा अति परिश्रम करून तुमच्या शरीराचा गैरवापर करू शकता. देवाची अपेक्षा आहे की त्याच्या लोकांनी शिस्तीने आपल्या शरीराची काळजी घ्यावी. शेवटी, हे देवाचे मंदिर आहे. तसेच, तुम्हाला माहीत आहे की तुमच्या जीवनावर देवाचे पाचारण झालेले आहे, याचा अर्थ असा नाही की तुम्ही जीवनात ध्येयविरहितपणे “भटकत” राहू शकता आणि तरीही देवाने तुमच्यासाठी जे काही ठरवले आहे ते पूर्ण करण्याची अपेक्षा करू

शकता. याउलट, तुम्हाला तुमच्या जीवनातील त्याचे पाचारण पूर्ण करण्यासाठी आणि देवाबरोबर चालण्यासाठी स्वतःला तयार करणे, प्रशिक्षण देणे आणि सुसज्ज करणे आवश्यक आहे.

ख्रिस्ती सेवेत सहभागी असलेल्यांसाठी, पृथ्वीवर पूर्णपणे प्रभावी होण्यासाठी केवळ शक्तिशाली अभिषेक पुरेसा नाही. या पृथ्वीवर देवासाठी प्रभावशाली होण्याकरिता, आपल्याला आयोजन करणे, समन्वय साधणे, आणि योग्य रीतीने आपल्या सेवेचे प्रयत्न कसे करावेत हे शिकण्याची गरज आहे. हे खरे आहे की अभिषेकच सैतानाचे जोखड नष्ट करतो आणि लोकांच्या जीवनातील ओझे काढून टाकतो, परंतु हे देखील खरे आहे की चुकीचे व्यवस्थापन आणि योग्य संघटन कौशल्याच्या अभावामुळे अनेकांवर जो अभिषेक सोपवलेला आहे त्या अभिषेकाचा प्रभाव वाढविण्याच्या मार्गात अडथळा निर्माण करतो.

कधीकधी, आपण स्वतः देवापेक्षा अधिक आध्यात्मिक असल्याचे भासवतो! कधीकधी आपण इतके आध्यात्मिक बनतो की आपण या पृथ्वीवर कुचकामी ठरतो. मला असे वाटते की अशा परिस्थितीमध्ये देवालाही त्याच्या राज्यासाठी आपल्याकडून काहीतरी उपयुक्त करून घेणे कठीण जाईल! एक काळ असा होता जेव्हा मी आपल्या कृतींमुळे आपल्या जीवनासाठी देवाच्या योजनेवर परिणाम झाला की नाही, बदल झाला की नाही आणि त्याचा प्रभाव पडला की नाही या मुद्द्यावर विचार करण्यात मी अनेक दिवस घालवले. तो खूप गंभीर काळ होता. एकीकडे, मला माहित होते की देव सार्वभौम आहे आणि त्याच्या योजनांचा पराभव होऊ शकत नाही. *“तुला सर्वकाही करता येते; तुझ्या कोणत्याही योजनेला प्रतिबंध होणे नाही”* (ईयोब 42:2). तरीही, दुसरीकडे, आपण संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये पाहतो की देवाला त्याचे उद्देश पूर्ण करण्यासाठी मानवी आज्ञाधारकपणा आणि सहकार्याची आवश्यकता आहे. सर्वसाधारण “सार्वत्रिक” पातळीवर, देवाला त्याच्या सार्वभौमत्वात त्याने संपूर्ण मानवजातीसाठी जे काही ठरवले आहे ते

पूर्ण करायचे आहे. परंतु वैयक्तिक स्तरावर, आपल्या जीवनासाठी देवाचे जे उद्देश आहेत ते उलघडण्या साठी आणि पूर्ण होण्यासाठी आपल्या कृतींचा त्यावर परिणाम होतो. हे दुःखद सत्य आहे की अनेक ख्रिस्ती लोक त्यांच्या स्वतःच्या कृतींमुळे त्यांच्या जीवनासाठी देवाची सर्वोच्च आणि सर्वोत्तम कार्ये पूर्ण करण्यात कमी पडतात.

# 5
# बुद्धी—आमचे सुरक्षा कवच

**उपदेशक 9:16,18**
**[16] ... बलाहून ज्ञान श्रेष्ठ खरे ...**
**[18] युद्धशस्त्रांपेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे ...**

**उपदेशक 10:10**
**... कार्यसिद्धीस ज्ञान उपयोगाचे आहे.**

**नीतिसूत्रे 4:7,8**
**[7] ज्ञान ही श्रेष्ठ चीज आहे म्हणून ते संपादन कर.**
**[8] त्याला उच्च पद दे म्हणजे ते तुझी उन्नती करील. त्याला कवटाळून राहशील तर ते तुझा गौरव करील.**

आपल्या कृतींचा आपल्या जीवनासाठी देवाच्या योजनेवर परिणाम झाला, बदल झाला आणि त्याचा परिणाम झाला की नाही या मुद्द्यावर मी विचार करत राहिलो, यावर विचार करताना, मला माझ्या आयुष्यातल्या अनेक घटना आठवल्या ज्यात मी चुका केल्या. मी जास्त परिश्रम केले असते तर? मी दुसऱ्याऐवजी हे निवडले असते तर? मी माझा वेळ आणि शक्ती इतर गोष्टींऐवजी एखाद्या विशिष्ट क्षेत्रात गुंतवली असती तर? मला त्या वेळी आवश्यक असलेली माहिती आणि ज्ञान माझ्याकडे असते तर—मला अधिक चांगल्या प्रकारे माहित असते तर गोष्टी वेगळ्या असत्या का? माझ्या स्वतःच्या कृतीमुळे मी सहन केलेल्या काही अडचणी आणि त्रास मी टाळू शकलो असतो. मी या गोष्टींबद्दल विचार करत असताना, मी फक्त माझ्या स्वर्गातील पित्याला हाक मारू शकलो  आणि माझ्या जीवनातील त्याच्या सर्वोच्च आणि सर्वोत्तम गोष्टीपासून वंचित राहू नये म्हणून प्रार्थना करू शकलो एवढेच काय ते. तसेच मी सुज्ञतेने निर्णय घेण्याच्या महत्व यावर गंभीरपणे

विचार करण्याकडे आकर्षित झालो. बुद्धी हे आमचे संरक्षण आहे. जेव्हा आपण शहाणपणाने चालतो तेव्हा आपण सुरक्षितपणे चालतो. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते, *"... नेमलेला काळ व न्यायसमय हे ज्ञान्याच्या मनाला अवगत होतील. प्रत्येक गोष्टीला नेमलेला काळ व न्यायसमय असतो"* (उपदेशक 8:5,6). प्रत्येक गोष्टीसाठी योग्य वेळ आणि योग्य निर्णय असतो. दिलेल्या परिस्थितीत काय करावे, कसे करावे आणि केव्हा योग्य गोष्ट करावी हे "बुद्धी" जाणते.

देवाचे वचन म्हणते, *"आपल्या पायांची वाट सपाट कर; तुझे सर्व मार्ग निश्चित असोत"* (नीतिसूत्रे 4:26). दुसऱ्या शब्दांत, थांबा, विचार करा आणि तुम्ही घेत असलेल्या निर्णयांबद्दल दोन किंवा तीनदा विचार करा. बऱ्याचदा, सुज्ञ निर्णय घेताना, संबंधित विषयावर आपले ज्ञान आणि समज वाढवण्यासाठी आपल्याला माहिती मिळवावी लागते. एखाद्या विशिष्ट क्षेत्रात अधिक शिकलेल्या आणि अनुभवी लोकांबरोबर बोलणे आणि शिकणे खूप फायदेशीर ठरेल. म्हणूनच पवित्र शास्त्र म्हणते, *"सुज्ञ पुरुष बलवान असतो; ज्ञानी मनुष्य आपले बल दृढ करतो. शहाणपणाने व्यवस्था करून युद्ध चालव; बहुत सुमंत्री असल्याने यश मिळते"* (नीतिसूत्रे 24:5,6). आपण स्वतःला इतके आध्यात्मिक समजू नये की आपल्याला संबंधित गरज भासणार नाही.

सेवेमध्ये कृपादान आणि अभिषेक विशेषतः महत्वाचे आहेत. तथापि, त्यांचा जास्तीतजास्त उपयोग व्हावा व कायमस्वरूपी प्रभाव राहण्या साठी, हे फार महत्त्वाचे आहे की, आपले कृपादान व अभिषेक या मध्ये उत्तम नेतृत्व कौशल्य, उत्तम संघटन, कठोर परिश्रम, शिस्त, निरंतर सुधारणा आणि भरपूर दैवी बुध्दी यांची भर घालणे अत्यावश्यक आहे.

# 6
# देवाचा चांगुलपणा

**नीतिसूत्रे 3:5,6**
**5 तू आपल्या अगदी मनापासून परमेश्वरावर भाव ठेव, आपल्याच बुद्धीवर अव-**
**लंबून राहू नकोस;**
**6 तू आपल्या सर्व मार्गांत त्याचा आदर कर, म्हणजे तो तुझा मार्गदर्शक होईल.**

तरीसुद्धा, आपला परात्पर देव चांगला आणि दयाळू आहे. एका लहान चिमणीलाही तो विसरत नाही. आपल्या डोक्याचे केस देखील मोजलेले आहेत (लूक 12:6,7). देव त्याच्या सार्वभौमत्वात, अलौकिकपणे आमच्या जीवनातील प्रत्येक दैनंदिन बाबीत स्वतःला सामील करतो. आपल्याकडून त्याची मागणी केवळ ही आहे की आपण त्याच्यावर विश्वास ठेवावा आणि त्याला कबूल करावे आणि त्याने आम्हास आमचे मार्गदर्शन करण्याचे अभिवचन दिले आहे. होय, जीवनातील अनेक समस्यांमध्ये ज्ञान आणि समज मिळवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. आपण हे करत असताना, आपली पावले परमेश्वराच्या आदेशानुसार होतील. *"परमेश्वर मनुष्याची गती स्थिर करतो, आणि त्याचा मार्ग त्याला प्रिय आहे"* (स्तोत्रसंहिता 37:23). देव आपल्या जीवनात घडणाऱ्या घटनांना त्याने आपल्यासाठी ठरवलेल्या मार्गावर नेण्यासाठी आदेश देईल. या प्रक्रियेत, आपण अजूनही चुका केल्या, अडखळलो आणि पडलो, तर आपण पूर्णपणे उद्ध्वस्त होणार नाही, कारण परमेश्वर आपल्याला सांभाळून घेतो. हा आपल्या जीवनासाठी देवाच्या स्वप्नाचा शेवट होणार नाही. *"तो पडला तरी सपशेल पडणार नाही; कारण परमेश्वर त्याला हात देऊन सावरील"* (स्तोत्रसंहिता 37:24). तो आम्हाला आमच्या पायावर उभा करेल आणि आम्हाला पुन्हा आमच्या प्रवासाला नेईल. त्याबद्दल देवाची स्तुती करा!

**स्तोत्रसंहिता 40:1-3**
**1 मी धीर धरून परमेश्वराची वाट पाहिली तेव्हा त्याने माझ्याकडे वळून माझा**
**धावा ऐकला.**
**2 नाशाच्या खाचेतून, दलदलीच्या चिखलातून त्याने मला वर काढले, माझे पाय**
**खडकावर ठेवले आणि माझी पावले स्थिर केली.**
**3 त्याने मला आपल्या देवाची स्तुती करणारे नवीन गाणे शिकवले. हे पाहून**
**पुष्कळजण घाबरतील आणि प्रभूवर विश्वास ठेवतील.**

स्तोत्रकर्ता दावीदाने स्वतःला *"नाशाच्या खाचेत"* सापडलेले आणि त्याचे पाय *"दलदलीच्या चिखलात"* अडकलेले पाहिले. त्याच्या अशा परिस्थितीत असण्याची अनेक कारणे असू शकतात. पण तो म्हणाला की तो *"धीराने देवाची वाट पाहत असताना,"* देवाने त्याची हाक ऐकली, त्याला खाचेतून बाहेर काढले आणि त्याचा मार्ग स्थिर केला (स्तोत्रसंहिता 40:1-3). हालेलुया! हा देवाचा चांगुलपणा आहे. जरी आपण चुका केल्या आणि एखाद्या भयंकर खड्ड्यात पडलो, तरी परमेश्वर आपल्याला उचलून पुन्हा भक्कम जमिनीवर ठेवू शकतो. आपल्या चुकांमुळे आपल्याला त्रास होऊ शकतो. आम्हाला चुकीची माहिती असल्या कारणाने घेतलेल्या निर्णयांमुळे विलंब होऊ शकतो. आपल्या अपयशामुळे अडथळे येऊ शकतात, परंतु जोपर्यंत आपण परमेश्वराला धरून राहू तोपर्यंत तो आपल्याला आपल्या जीवनासाठी त्याच्या योजना पूर्ण करण्यास पुन्हा सक्षम करेल. आपल्या अपयशापेक्षा देव महान आहे. तो आपल्या चुकांपेक्षा महान आहे. जर आपण आपल्या चुकांमधून शिकलो, शहाणे झालो आणि धाव चालू ठेवली तर देव आपल्याला आपल्या अंतिम गंतव्यस्थानावर नेईल. आपल्या दु:खाचे नृत्यात रूपांतर करणारा देवच आहे. *"तू माझा विलाप दूर करून मला नाचायला लावले आहेस; तू माझे गोणताट काढून मला हर्षरूपी वस्त्र नेसवले आहेस"* (स्तोत्रसंहिता 30:11). देव वाईट गोष्टीना बदलून सुंदर बनवू शकतो. तो आपल्या निराशेचे दैवी आशीर्वादित भविष्यात रूपांतर करतो. देव काळापेक्षा मोठा आहे. *"मी तुमच्यावर पाठवलेले आपले महासैन्य म्हणजे झुंडींनी येणारे टोळ, चाटून खाणारे*

*टोळ, अधाशी टोळ व कुरतडणारे टोळ ह्यांनी ज्या वर्षांचे उत्पन्न खाल्ले त्यांची तुम्हांला भरपाई करून देईन"* (योएल 2:25). आपल्या चुकीच्या निवडीमुळे वाया गेलेल्या वेळेची भरपाई कशी करायची हे त्याला माहीत आहे.

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"*** **(रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"*** **(प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"*** **(रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word–The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses–Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work–Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

**किशोरवयीन मुलांसाठी**

**वैयक्तिक सल्ला**

**नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने**

**शिक्षेतील उणीव**

**कामाशी संबंधित समस्या**

**कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक**

**पालक/मुले/भावंडे/समवयस्क**

**वर्तणूक विकार**

**व्यक्तिमत्व विकार**

**मानसिक भावनिक / अडचणी**

**तणाव/आघात**

**मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन**

**आध्यात्मिक समस्या**

**लाईफ कोचिंग**

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च," बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout,
Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*

"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play







*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌त कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9:00 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

हे खरे आहे की आपण अपूर्ण असलो तरी आपण सर्वच चुका करतो. ज्या परिस्थितीत आपण प्रथमच सामोरे जातो, चुकीच्या निर्णयाचे गंभीर परिणाम होऊ शकतात. आपल्या चुकीच्या निवडींचा देवाने आपल्यासाठी केलेल्या योजनेवर कसा परिणाम होतो? आपल्या चुका पराभूत होतात, बदलतात किंवा कोणत्याही प्रकारे देवाच्या सर्वोच्च आणि सर्वोत्तम गोष्टी आपल्या जीवनात साध्य होण्यापासून रोखतात?

या पुस्तकाचा उद्देश आपल्या ख्रिस्ती विश्वासाच्या व्यावहारिक बाजूबद्दल आपल्याला जागृत करणे हा आहे. आपल्या जीवनासाठी देवाची योजना पार पाडण्याची आपली गंभीर जबाबदारी आपल्याला समजावी हा त्याचा उद्देश आहे. आपल्या कृतींचे आध्यात्मिकीकरण करणे थांबवणे आणि त्यांची जबाबदारी घेणे हे एक आव्हान आहे. या जीवनातील व्यवहारात 'शहाणे' होण्याचा हा उपदेश आहे.




All Peoples Church & World Outreach
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org